# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.03.2026** **वार- सोमवार**

---

**पुणेमहानगरपालिका अंदाजपत्रक**

पुणे महानगरपालिकेचं २०२६-२७ या वर्षाचे 13 हजार 995 कोटी रुपयांचे वार्षिक अंदाजपत्रक महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी आज स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भीमाले यांना सादर केलं. शहराचा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन, यंदाच्या अंदाजपत्रकात 'इझ ऑफ लिव्हिंग' या संकल्पनेला प्राधान्य देण्यात आले आहे.

पुणेकरांचा प्रवास सुखकर करण्यासाठी पी एम पी एम एल च्या ताफ्यात 1000 नवीन सीएनजी बसेस आणि केंद्र सरकारच्या फेम-२ योजनेअंतर्गत 1000 ई-बसेस दाखल होणार आहेत. यासाठी ५९2 कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उड्डाणपुलासारखे प्रकल्प आणि ३२ 'मिसिंग लिंक' रस्त्यांच्या कामांना वेग दिला जाणार असून यासाठी ७४० कोटी रुपयांचे नियोजन आहे.

मुळा-मुठा नदीकाठ सुधारणेसाठी ,नदीकाठी ३० मीटर रुंदीचा सलग रस्ता आणि सायकल ट्रॅक विकसित केला जात आहे.
मिशन लाईफ' अंतर्गत शहरात एअर क्वालिटी मॉनिटरिंग सेन्सर्स आणि ५१ कोटींच्या पर्यावरणपूरक योजना राबवल्या जातील.
आरोग्य विभागासाठी ८८१ कोटींची तरतूद असून, कमला नेहरू रुग्णालय अद्ययावत करण्यासाठी आणि भटक्या कुत्र्यांच्या लसीकरणासाठी विशेष मोहीम आखली आहे.'

पाणीपुरवठा विभागासाठी 2017 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
स्थायी समितीचे अध्यक्ष महापालिका आयुक्तांच्या अंदाजपत्रकात बदल सुचवून ते महापालिकेच्या मुख्य सभेला सादर करतील.

**महापालिका स्वीकृत नगरसेवक घोषणा**

पुणे महापालिकेच्या स्वीकृती सदस्य पदासाठी आज भारतीय जनता पार्टी कडून जयप्रकाश पुरोहित, विश्वास ननावरे, प्रिया शेडगे, उदय लेले, राजेंद्र काकडे, निलेश कोंढाळकर आणि रवींद्र साळेगावकर यांच्या नावाची घोषणा झाली आहे. कॉंग्रेस तर्फे इंटकचे अध्यक्ष, कामगार नेते सुनील शिंदे यांना संधी देण्यात आली आहे तर राष्ट्रवादी कॉंग्रेस तर्फे राकेश कामठे, आणि माजी महापौर दत्तात्रय धनकवडे यांच्या नावाची घोषणा झाली आहे.

**रिक्षा परवाना वाटप स्थगित**

राज्यातल्या शहरांमध्ये होणारी वाहतूक कोंडी आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांमुळे रिक्षाच्या परवान्यांचं वाटप आजपासून स्थगित करत असल्याचं राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी जाहीर केलं. मुंबईत विधानभवन परिसरात वार्ताहरांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. अनेक शहरांमध्ये वाहतूक कोंडी आणि वायूप्रदूषण होत असल्याच्या तक्रारी येत होत्या; त्यामुळे हा निर्णय घेतला आहे, काही अटीशर्तींची पूर्तता करून परवाने देता येतील का, याविषयी केंद्राशी चर्चा सुरू आहे; त्याबाबतचा निर्णय नंतर जाहीर होईल, असं सरनाईक म्हणाले.

**लेझर स्पीड कॅमेरे**

रस्ते अपघातांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पुणे ग्रामीण पोलीस यांनी प्रथमच लेझर स्पीड कॅमेऱ्यांचा वापर सुरू केला आहे. लोणावळा आणि वडगाव मावळ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सहा महिन्यांसाठी हा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे.

**साखरसाठा**

अमेरिका, इस्राईल आणि इराण यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतातील साखरेच्या निर्यातीवर मोठा परिणाम झाला असून निर्यात जवळपास ठप्प झाली आहे. केंद्र सरकारने २० लाख मेट्रिक टन साखर निर्यातीला परवानगी दिली असली, तरी आतापर्यंत केवळ चार लाख टन साखर निर्यात झाली आहे. त्यामुळे देशात साखरेचा मोठा साठा उपलब्ध आहे, या अतिरिक्त साखरेमुळे देशांतर्गत बाजारात दरांवर दबाव वाढण्याची शक्यता असून शेतकरी आणि साखर कारखान्यांना मदत करण्यासाठी केंद्र सरकारने योजना राबवावी, अशी मागणी साखर क्षेत्रातील तज्ञ करत आहेत.

**आयआयटीएम करार**

देशासाठी एक विश्वासार्ह राष्ट्रीय हवामान डेटाबेस तयार केला जात असून, त्यामुळे हवामान बदलाचे अचूक मॉडेलिंग आणि दीर्घकालीन हवामानाचा अभ्यास करणे शक्य होणार आहे. पुण्यातील 'भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था' आणि राजस्थानमधील 'बिकानेर तंत्रज्ञान विद्यापीठ' यांच्यात या संदर्भात ५० वर्षांचा सामंजस्य करार करण्यात आला आहे.

**अंमलबजावणी**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने आठ वर्षापूर्वी जारी केलेल्या परिपत्रकाची अंमलबजावणी उद्यापासून होत आहे. त्यानुसार छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील फळभाजी, कांदा-बटाटा विभागात उद्यापासून ५० किलोपेक्षा जास्त वजनाचा शेतीमाल चढ-उतार न करण्याचा निर्णय कामगारांनी घेतला आहे. पन्नास किलोवरील वजनाच्या पोत्यांमुळे कामगारांना मणके आणि गुडघेदुखीचा त्रास होत आहेत. याशिवाय प्लास्टिक सदृश बारदानामुळे लोखंडी हूक सुटून दुखापती होत आहेत. मार्केट यार्डातील कामगार, वारणार, भरणार, तोलणार, तसेच महिला कामगारांच्या बैठकीत या निर्णयाचा पुनरुच्चार केला.

**हवामान**

पुणे शहर आणि परीसरात आज कमाल तापमान 37 तर किमान तापमान 15 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नाही.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू ताज्या पुणे वृत्तांतसह विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता. नमस्कार.**